महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९२९ /२०२३ दि. २१/०८/२०२३

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** वाहतुक उप विभाग, विठ्ठलवाडी हद्दीतील उल्हासनगर कॅम्प नं.५ येथे सिंधी बांधवांचा **"चालीया"** उत्सव साजरा होत आहे. दि. २२/०८/२०२३ रोजी "चालिया" उत्सव सांगता समारोह कार्यक्रमाच्या अनुषंगाने उत्सवाचे वेळी सदर परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित रहावी, जनेची गैरसोय होवु नये याकरीता, आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद–** १) उल्हासनगर कॅम्प नं. ५ रेशन ऑफीस रोड, लाल चक्की कडून बाजारपेठ मार्गे दुधनाका बाजूकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लाल चक्की कॉर्नर** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदर मार्गावरील **दुचाकी, तीनचाकी व हलकी वाहने** लाल चक्की कॉर्नर येथून नारायण बनवारी मार्गे– सेक्शन ३६, ३७ मार्गे टेऊराम रोडने तसेच **इतर जड वाहने व एस.टी.बसेस** आय.बी.पी. पेट्रोल पंपाच्या समोरील रेशन ऑफीस येथून वळवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** २) दुधनाका बाजारपेठ कडून लालचक्की नाका बाजारपेठकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **दुधनाका** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने दुधनाका येथून टेऊराम आश्रम मार्गे अथवा झुलेलाल मार्केट मार्गे भाटीया रोडने इच्छित स्थळी जातील.

**नो पार्किंग–** ३) दुधनाका ते लालचक्की दरम्यान रोडनेदोन्ही बाजूस **सर्व प्रकारच्या वाहनांना पार्किंग करण्यास मनाई** करण्यात येत आहे.

**प्रवेश बंद–** ४) रेशन ऑफीस रोड कडून जीवनघोट आश्रम रोडने चालीया मंदीराकडे येणाऱ्या वाहनांना **जीवनघोट आश्रम** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने दसरामैदान येथुन डावीकडे वळन घेवुन गांधी चौक –झुलेलाल गाउन मार्केट मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ५) गांधीरोड तहसिल कार्यालयाकडून मठमंदीर नाक्याकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शोभराज गार्डन कॉर्नर** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने गांधीचौक येथुन उजवीकडे वळन घेवुन झुलेलाल मार्केट किंवा भाटीया चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ६) मच्छीमार्केट रोडने गल्ली नं. १ व २ नवजीवन बॅक येथे व मठमंदीर नाक्याकडून वसंतशहा बाजाराकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मठमंदीर नाका** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने ही मच्छिमार्केट येथुन शोभराज गार्डन मार्गे झुलेलाल मार्केट रोडने दुधनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग–** अंबरनाथकडे जाणाऱ्या एस.टी बसेस लॉरी टेम्पो इ. वाहने ही उल्हासनगर कॅम्प नं ५ नेताजी चौक, कुर्ला कॅम्प रोड, कैलास कॉलनी मार्गे जातील व त्याच मार्गाने परत येतील.

**प्रवेश बंद–** ७) पोष्ट ऑफिस कडुन टिळक चौकाकडे येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने गांधीरोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही दिनांक २२/०८/२०२३ रोजी सकाळी ०६:०० वा. पासून २४:०० वा. पर्यंत अमलात राहील. सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

21/8/23

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CS CamScanner

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/- सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा.पोलीस आयुक्त,ठाणे शहर
मा.पोलीस सह आयुक्त,ठाणे शहर
मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.
मा.जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद.

प्रत कार्यवाहीसाठी :-
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत:- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/- सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/- सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :- सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/- म.न.पा.उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner